




# सायं.दैनिक प्रारंभ बीड

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे








बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक ३४३ ■ बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■ पाने-४

Beed (Maharashtra) ■ Years-5 ■ Issu-343 ■ Wednesday, 18 February-2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4


## पायलटने अजितदादांचं विमान मुद्दाम खाली आपटलं अन् स्फोट घडवला

### रोहित पवारांचा हादरवणारा आरोप



प्रारंभ । वृत्तसेवा

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या दिवशी बारामतीत दृश्यमानता (व्हिजिबिलिटी) कमी असतानाही वैमानिक कॅप्टन सुमित कपूर याने विमान माघारी न फिरवता खाली उतरवले. त्याने विमानाचा स्फोट करण्यासाठी विमान मुद्दाम खाली आदळले, असा खळबळजनक आरोप रोहित पवार यांनी केला. ते बुधवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अनेक नव्या शंका उपस्थित केल्या. यावेळी त्यांनी विमानाचा पायलट सुमित कपूर आणि व्हीएसआर कंपनीवर गंभीर आरोपही केले.

मुंबईवरुन बारामतीला जाण्यासाठी फार इंधनाची गरज नव्हती. तरीही अजितदादांच्या विमानाच्या पंखातील इंधनाच्या टाक्या पूर्णपणे भरण्यात आल्या होत्या. हे विमान बारामतीवरुन हैदराबादला जाणार होते. तिथे विमानात पुन्हा इंधन भरता आले असते. मात्र, हे विमान सुरतवरुन मुंबईला येत असतानाच त्याच्या इंधन टाक्या पूर्णपणे भरल्या होत्या. या विमानात अपघाताच्या वेळी ३००० ते ३५०० लीटर इंधन होते. एवढेच नव्हे तर विमानाच्या टॉयलेटजवळ इंधनाचे अतिरिक्त कॅनही ठेवले

## आष्टीत 'उमेद' अंतर्गत कर्ज मंजुरी, वितरणाचा मेळावा ; खा.सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील स्वयं सहाय्यता समूहांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'उमेद' अर्थात दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान अंतर्गत बँक कर्ज मंजुरी पत्र व कर्ज वितरणाचा भव्य मेळावा गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



ग्रामीण भागातील महिला बचत गटांना स्वावलंबी बनविणे, लघुउद्योगांना चालना देणे व आर्थिक बळकटी प्रदान करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कर्जांचे प्रत्यक्ष वितरण या मेळाव्यात करण्यात येणार असून पात्र स्वयं सहाय्यता समूहांना कर्ज मंजुरी पत्रे प्रदान करण्यात येतील. मेळाव्याचे आयोजन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड, पंचायत समिती आष्टी तसेच संबंधित बँकांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. दरम्यान, कार्यक्रमाच्या निमित्ताने नागरिकांना व स्वयं सहाय्यता समूहांच्या सदस्यांना आपल्या तक्रारी व अडचणी थेट अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. ▶▶ पान २ वर...













# घातक पाणी

इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. इंदूरनंतर महूतील घटना, प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील जलसंकट आणि दूषित पाण्याची चर्चा सध्या देशभर आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलजन्य आजारांमुळे अनेक रुग्ण विशेषतः लहान मुले रुग्णालयात दाखल आहेत. ज्या शहराला स्वच्छतेबद्दल सातत्याने पुरस्कार मिळत आले आहेत, त्या राज्यातील लहान मुले दूषित पाण्यामुळे आजारग्रस्त आहेत, हे विदारक सत्य पाहायला मिळत आहे. महूमध्ये २२ जणांमध्ये काविळीची लक्षणे आढळून आली. वास्तविक कावीळ हा काही असाध्य आजार नाही. पण इंदूरच्या जलवाहिन्यांमध्ये असलेल्या प्रदूषणामुळे भयानक रोगाने पुन्हा डोकेवर काढले आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे काहीजण मृत्यूमुखी पडल्यावर महूतील घटना इंदूरची प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

महु येथे तर एक विहीर दूषित पाण्याने भरलेली आढळली. २४ हून अधिक नागरिक येथे आजारी पडले आणि आता या भागातील प्रशासनाने खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत. इंदूरच्या घटनेनंतर महु येथील घटना प्रशासनाला खडबडून जाग आणणारी ठरली आहे. पण यामुळे नागरिकांना पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यासाठी चांगले पाणी मिळेल का असा प्रश्न उभा राहिला आहे. इंदूर की महू असो की भारतातील कोणतेही लहान तालुकास्तरीय गाव असो, येथील नागरिकांना एका व्यापक सत्याला सामोरे जावे लागत आहे. ते म्हणजे स्वच्छ पाण्यापर्यंत पोहोच आणि सुरक्षा हे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. पण, नेमके तेच त्यांना मिळत नाही. केवळ नागरिकांना पाणी देण्यामुळे आरोग्यावर झालेले परिणाम सुधारणार नाहीत तर त्यासाठी स्वच्छ पाणी मिळणे तितकेच गरजेचे आहे. भारतात जे जलजन्य आजारांच्या साथी येत आहेत. त्यांना दुर्दैवी परंतु पृथक स्थानिक स्वराज्य संस्थांची ढिलाई म्हणून पाहिले जाते. स्थानिक अधिकाऱ्यांचे हे अपयश तर आहेच पण जुनाट पाइपलाइन आणि क्वचित गंजलेल्या पाइपमधून पाणीपुरवठा होत राहणे हेही या साथींचे कारण आहेच. भागीरथपुरा येथील दुर्घटना हे दर्शवते, की हा एक अपघात नव्हता तर संभाव्य दृश्य परिणाम होता ज्यात सरकारी कारभाराचे मॉडेल ज्यात केवळ दिखाऊ स्वच्छता आणि आकडेवारीने मूलभूत सार्वजनिक आरोग्य आणि लोकांना स्वच्छ पेयजल देण्याचे वचन पाळले गेले नाही. इंदूर शहरातील शोकांतिकेने एक प्रश्न निर्माण केला आहे तो म्हणजे नळातून जर सांडपाणी येत असेल तर शहराच्या स्वच्छतेला काय अर्थ?. सरकारने टाकलेल्या जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. तसेच इंदूरमध्ये अतिसाराची साथ आली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला आहे. याचा अर्थ सरळ आहे. नगरपालिका प्रशासनाने यात कुचराई केली आहे. जलवाहिन्या गंजलेल्या आहेत आणि भगीरथपुरा येथील एक जलवाहिनी तर स्वच्छतागृहाच्या खाली दबलेली होती. महूमध्ये पट्टी बाजार आणि चंदन नगर येथे गळक्या पाइपलाइनमुळे काविळीची साथ पसरली, महुमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची जबाबदारी कटक मंडळ (कॅन्टोनमेंट बोर्ड)ची आहे. रहिवाशांना उकळून पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला. पण 'बैल गेला आणि झोपा केला' अशी ही स्थिती आहे. कॅगने २०१९ च्या अहवालात ८.९५ लाख रहिवाशांना दूषित पाण्याचा पुरवठा केल्याचा ठपका ठेवला होता. तसेच पाण्याच्या नमुन्यांचे सर्वेक्षण न केल्याचा आरोपही करण्यात आला होता. हे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी अक्षम्य छेडछाड आहे असे नमूद करावे लागेल आणि त्याबाबत कुणालाही खंत नाही किंवा खेदही नाही ही बाब जास्त दुःखदायक आहे. अधिकाऱ्यांनी पाण्यामुळे होणाऱ्या आजाराची ५.४५ लाख प्रकरणे नोंदवली. पण त्यातही गंभीर बाब अशी की कॅगने आपल्या अहवालात पाण्याच्या चाचण्यांचा अभाव नोंदला आहे. त्यामुळे इंदूर किंवा महू किंवा मध्य प्रदेशात कुठेच पाणी दूषित आहे की नाही याची काहीच खातरजमा करता येत नाही. आता हा दूषित पाण्याचा पुरवठा हा निश्चितच मध्यप्रदेशातील राजकीय पक्षांसाठी वादाचा मुद्दा बनला आहे. या मुद्यामुळे व्यापक पाण्याचा पेच तर ऐरणीवर आला आहेच पण काँग्रेस आणि भाजप यांच्यात जोरदार वाद रंगला आहे. काँग्रेसने या मुद्यावर व्यापक जनमोर्चे आयोजित केले तर भाजपने त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. वास्तव हे आहे की पाणी हा राजकीय मुद्दा आहेच. कारण पाण्यावरून लढाया होतील असे भाकीत वर्तवले होते. कोणतेही सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो, ते इतक्या अफाट लोकसंख्येला पुरेसे आणि स्वच्छ पाणी पुरवू शकत नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की इंदूर नगरपालिकेने केले ते योग्य केले. पण सरकारची क्षमता इतक्या लोकसंख्येला सुरक्षित पाणी पुरवण्याची नाही. यात राजकारण आणणे चुकीचे नव्हे तर निषेधार्ह आहे. मध्यप्रदेशात जे घडले किंवा घडत आहे ते सार्वत्रिक दृश्य आहे. त्यात नगरपालिका स्वच्छ पाण्याचा पुरवठा करत नसतील आणि त्यात काही अडचणी असतील तर त्यांना ती नगरपालिका जबाबदार आहे.

# !! पोरांनो, शिवराय व्हा !!!




आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि कधी कधी दिशाहीन होत चाललेल्या काळात युवकांसमोर आदर्श कोणाचा ठेवायचा, हा प्रश्न गंभीर आहे. यशाची व्याख्या केवळ पद, पैसा आणि प्रसिद्धी इतकीच उरली आहे का? की त्याही पलीकडे काही मूल्याधिष्ठित, राष्ट्रनिर्माणकारी जीवनदृष्टी आहे? या प्रश्नाचे भक्कम उत्तर म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तिमत्त्व. म्हणूनच आजच्या पिढीला आवाहन करावेसे वाटते ''पोरांनो, शिवराय व्हा!''

शिवरायांच्या ठायीचा सर्वात ठळक गुण म्हणजे त्यांची अप्रतिम कल्पकता. स्वराज्य ही केवळ राजकीय संकल्पना नव्हती; ती एका परावलंबी समाजाच्या आत्मविश्वासाची पुनर्स्थापना होती. त्या काळी दहाहजारी-वीसहजारी मराठे सरदार यवनी सत्तेखाली मोठमोठ्या जहागिरी उपभोगत होते. शौर्य, स्वधर्माभिमान किंवा स्वातंत्र्यप्रेम त्यांच्यात नव्हते असे म्हणता येणार नाही. तरीही ''स्वराज्य'' ही कल्पना त्यांच्या मनात का जन्मली नाही?

कारण कल्पकतेचा अभाव, शिवरायांच्या बुद्धीत माहिती गोळा करण्याची प्रचंड ओढ होती. दुसऱ्यांच्या अनुभवांतून शिकणे, त्यात स्वतःच्या अनुभवांची भर घालणे आणि त्याचा योग्य वेळी अचूक वापर करणेही त्यांची कार्यपद्धती होती. स्मरणशक्ती आणि विवेकशक्ती यांच्या संगमातून त्यांच्या ठायी अद्भुत युक्तिमत्ता विकसित झाली. एक योजना फसली तर दुसरी, दुसरी फसली तर तिसरीपराभव हा पर्यायच नाही, हा त्यांचा निर्धार!

आजच्या तरुणांनी इथून धडा घ्यायचा आहे. अपयशाने खचू नका; नव्या वाटा शोधा. स्पर्धा परीक्षेत अपयश आले? व्यवसायात तोटा झाला? तर मार्ग बदला, ध्येय नव्हे! हीच शिवरायांची कल्पकता होती.

शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वातील दुसरा जाज्वल्य गुण म्हणजे तेजस्विता. खरा तेजस्वी पुरुष दुसऱ्याची ताबेदारी सहन करू शकत नाही. परतंत्रतेत मिळणारे वैभव त्याला तुच्छ वाटते. स्वपित्याची परावलंबी स्थितीही शिवरायांना असह्य झाली. जीवितहानीचा संभव माहीत असूनही त्यांनी स्वराज्याचा उद्योग हाती घेतला.

मोगल दरबारात सार्वभौम बादशहाच्या तावडीत सापडूनही मानखंडना सहन न करणेहा त्यांचा स्वाभिमान! आजच्या युवकांनी स्वतःची किंमत ओळखली पाहिजे. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे; तो आत्मसन्मान आहे. चुकीसमोर न झुकणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहणेहीच खरी तेजस्विता. आज आपण किती सहज तडजोड करतो! भ्रष्टाचार पाहूनही गप्प बसतो, अन्याय दिसूनही दुर्लक्ष करतो. शिवरायांचा संदेश स्पष्ट आहेस्वाभिमान जपा, परंतु विवेकाने!

शिवरायांचा आणखी एक अनुकरणीय गुण म्हणजे स्वप्रजावात्सल्य. त्यांची सत्ता ही केवळ राज्य करण्यासाठी नव्हती; ती लोककल्याणासाठी होती. शेतकरी, व्यापारी, उदमी यांचा उत्कर्ष व्हावा, न्याय मिळावा, बेबंदाई थांबावीयासाठी त्यांनी सुबक राज्यव्यवस्था उभी केली. अधिकाऱ्यांवर देखरेख, हेरव्यवस्था, जबाबदाऱ्यांचे स्पष्ट विभाजनयामुळे रयतेला सुरक्षितता लाभली. जातीपातीचा पक्षपात नव्हता; गुणवंताला संधी होती. यवनी प्रजेलाही न्यायाने वागविण्याची उदारता त्यांच्या ठायी होती. म्हणूनच



त्यांच्या राज्यात दंगेधोपे नव्हते; सर्व प्रजा त्यांना देवासमान मानत होती. आजच्या लोकशाहीतही हा आदर्श किती आवश्यक आहे! सत्तेत असो वा सामान्य नागरिक, प्रत्येकाने समाजहिताचा विचार करणेहीच खरी शिवरायांची शिकवण.

आजच्या पिढीसाठी, ''पोरांनो, शिवराय व्हा!'' याचा अर्थ तलवार उचलणे नव्हे; तर कल्पक व्हा समस्यांना नव्या दृष्टीने सामोरे जा. स्वाभिमानी व्हा अन्यायाविरुद्ध ठाम उभे रहा. कर्तव्यदक्ष व्हा समाजासाठी काहीतरी घडवा. निःपक्षपाती व्हा जात, धर्म, भाषा यापलीकडे जाऊन माणूसपण जपा. शिवरायांचे कर्तृत्व केवळ इतिहासपुस्तकात बंदिस्त ठेवायचे नाही. ते विचाररूपाने रक्तात भिनवायचे आहे. राष्ट्राच्या अभ्युदयासाठी तेजस्वी, कल्पक आणि प्रजावात्सल नेतृत्व आवश्यक असते, हे त्यांच्या जीवनातून स्पष्ट होते. आज भारताला, महाराष्ट्राला आणि या जगाला अशाच तरुणांची गरज आहेजे अपयशावर मात करतील, स्वाभिमान जपतील आणि समाजासाठी झटतील.म्हणून पुन्हा एकदा आवाहन-पोरांनो, शिवराय व्हा! स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी जगा; स्वार्थासाठी नव्हे, तर स्वराज्यासाठी लढा! जय जिजाऊ, जय शिवराय

**डॉ. महादेव अंगद जगताप**
श्री बंकटस्वामी महाविद्यालय,
बीड ८६६८३८१०२२

# आष्टीत १९ फेब्रुवारीला राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन

## शेतकरी नेते शिक्षण महर्षी भीमराव धोंडे यांचा पुढाकार; हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीची अपेक्षा

**आष्टी । प्रतिनिधी**

नवे तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन मराठवाड्यातील सर्वात मोठे समजले जाणारे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन (वर्ष - ३ रे) गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथे भव्यदिव्य वातावरणात पार पडणार आहे. शेतकरी नेते, शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते व सामाजिक नेतृत्व म्हणून ओळख असलेले भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून मतदारसंघातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन युवा नेते अजय धोंडे यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर आयोजित उद्घाटन सोहळ्यास राज्याच्या उपमुख्यमंत्री सुमित्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून राज्यातील कृषी क्षेत्रातील धोरणात्मक दिशा, नवतंत्रज्ञान व शेतकरी सक्षमीकरणावर मार्गदर्शन होणार आहे.

शेतकरी हितासाठी आयुष्य समर्पित

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणारे भीमराव धोंडे हे केवळ राजकीय नेतृत्वापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून शेतकरी कल्याणासाठी झटणारे नेतृत्व म्हणून



ओळखले जातात.

आष्टी तालुक्याला कुकडी प्रकल्पाचे पाणी मिळावे यासाठी मुंबईपर्यंत पायी मोर्चा

सुपीक जमीन लष्करी छावणीसाठी अधिग्रहित करण्याचा निर्णय रद्द करण्यासाठी दिल्लीपर्यंत पायी मोर्चा

ग्रामीण भागात शिक्षण संस्था उभारून विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली

या संघर्षांमुळे शेतकरी व ग्रामीण समाजामध्ये त्यांच्याविषयी विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

आधुनिक शेतीचा महामेळा

विज्ञानयुगात शेती व्यवसाय झपाट्याने बदलत असून उत्पादनवाढ, खर्च कमी करणे आणि शाश्वत शेती या उद्दिष्टांसाठी नवतंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक झाला आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित कृषी प्रदर्शनात खालील विषयांवर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन दिले जाणार आहे:

प्रमुख आकर्षणे

अत्याधुनिक कृषी अवजारे व स्मार्ट यंत्रसामग्री, ड्रोनद्वारे फवारणी व पिकांचे निरीक्षण, सुधारित व हवामान-प्रतिरोधक बियाणे, सेंद्रिय व नैसर्गिक शेती तंत्र, ठिबक सिंचन व जलसंधारण उपाय, पशुपालन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय, फलोत्पादन व उच्च मूल्य पिके, कृषी प्रक्रिया उद्योग व मूल्यवर्धन तंत्र, विविध शासकीय विभाग, कृषी विद्यापीठे, खाजगी कंपन्या, स्वयंसेवी संस्था व प्रगत शेतकरी यांचे स्टॉल शेतकऱ्यांसाठी ज्ञानाचे केंद्र ठरणार आहेत.

कृषी तज्ज्ञ व मान्यवरांचे मार्गदर्शन

कार्यक्रमास कृषी, पशुसंवर्धन, पर्यावरण, प्रशासन व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन करणार आहेत. धोरणात्मक निर्णय, हवामान बदलाचे परिणाम, बाजारपेठेतील संधी आणि कृषी उद्योजकतेवर विशेष सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून मा. आ. भीमराव धोंडे तर निमंत्रक म्हणून डॉ. अजयदादा धोंडे व अभयराजे धोंडे कार्यरत आहेत.

आयोजन व स्थळ वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्न आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित कृषी महाविद्यालयाच्या वतीने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. स्थळ: पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर, नगर-जामखेड रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड

शेतकऱ्यांसाठी नव्या संधींचे दालन

हे प्रदर्शन केवळ उपकरणे व तंत्रज्ञान पाहण्यापुरते मर्यादित नसून शेतकऱ्यांना:

उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय

बाजारपेठेतील संधी व मूल्यवर्धन

हवामान बदलाशी जुळवून घेणारी शेती

कृषी उद्योजकतेच्या नव्या दिशा

याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना

अशा प्रकारची राज्यस्तरीय प्रदर्शने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देतात. शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक आणि कृषी तज्ज्ञ यांच्यातील संवादामुळे ज्ञानाची देवाणघेवाण होते आणि शेती अधिक शाश्वत व नफ्याची बनविण्याचा मार्ग खुला होतो. शेतकऱ्यांनी या प्रदर्शनात सहभागी होऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा आणि शेती व्यवसायात भरभराट साधावी, असे आवाहन युवा नेते अजय धोंडे यांनी केले आहे. एकूणच, आष्टी येथे होणारे हे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन मराठवाड्यातील शेतीला नवी दिशा देणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

पान १/४ वरून

## मुंबई क्लायमेट वीकमध्ये पर्यावरण

नमूद केले. आव्हानांची व्याप्ती मोठी असल्याने अधिक मजबूत भागीदारी आणि नवोन्मेष आवश्यक असून हवामान-संवेदनशील नियोजन आणि प्रतिरोधक पायाभूत सुविधा ही राज्य आणि देशभर मानक पद्धत व्हावी, हा शासनाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.या परिषदेत आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील शहरांसह ३० हून अधिक देशांतील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. यापूर्वीच विविध देशांतील प्रतिनिधींशी केलेल्या संवादातून समान पर्यावरणीय चिंता आणि उपाययोजनांवर चर्चा झाल्याचे त्यांनी नमूद केले. हवामान कृती यशस्वी होण्यासाठी सर्वांनी एकाच दिशेने विचार करून भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि हरित पर्यावरण निर्माण करण्याचे सामूहिक ध्येय ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

जबाबदारीची जाणीव हीच भविष्य घडवते, असे सांगत पुढील दिवसांत ठोस निष्पत्ती, टिकाऊ भागीदारी आणि मोजता येण्याजोगी हवामान प्रगती साधण्याची अपेक्षा श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरण उभारण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

## आष्टीत 'उमेद' अंतर्गत

त्यामुळे संबंधित लाभार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या हाताला काम व उद्योगाला चालना देत आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक सक्षम करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असून, या कर्ज वितरण मेळाव्यामुळे आष्टी तालुक्यातील अनेक कुटुंबांना आर्थिक बळकटी मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पान १/४ वरून

**कार्यक्रमाचे वेळापत्रक**

दौलवडगाव-सकाळी ९.३० वाजता, धानोरा-सकाळी ११ वाजता, कडा-दुपारी २ वाजता, आष्टी- दुपारी ४ वाजता कार्यक्रम आयोजीत केला आहे. सदरील कार्यक्रम वेळेत होणार असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे.

## पायलटने अजितदादांचं

होते. या सगळ्यात पायलटचा वापर करुन अजित पवार यांच्या विमानाचा अपघात घडवण्यात आला, असे आम्हाला वाटते. विमानात जास्त इंधन असेल तर मोठा स्फोट होईल, हा आमचा संशय खरा ठरताना दिसत आहे. बारामतीच्या धावपट्टीवर उतरण्यासाठी दृश्यमानता कमी असूनही पायलट सुमित कपूर यांनी माघारी न फिरता एक गिरकी घेऊन विमान खाली उतरवण्याचा प्रयत्न केला. किंबहुना त्यांनी विमान मुद्दाम खाली आदळले आणि स्फोट घडवून आणला, असा आरोप रोहित पवार यांनी केला.

विमानाच्या लँडिंगसाठी ५००० इतकी दृश्यमानता लागते. मात्र, बारामतीत त्यावेळी ३५०० इतकीच दृश्यमानता होती. मुळात मुंबईतून उड्डाण करतानाच दृश्यमानता कमी होती. तरीही विमानाच्या उड्डाणासाठी परवानगी देण्यात आली. यानंतरही विमानाने उड्डाण केले तरी ते बारामतीत लँड करायला नव्हते पाहिजे. त्यामुळे या अपघाताबाबत घातपाताचा संशय अधिक बळावतो, असे रोहित पवार यांनी म्हटले.

यावेळी रोहित पवार यांनी व्हीएसआर या विमानसेवा देणाऱ्या कंपनीवरही गंभीर आरोप केले. व्हीएसआर कंपनीचा गोपी नावाच हॅंडलर मुंबईत बसतो. तो फ्लाईट प्लॅनमध्ये फेरफार करु शकतो. माझ्या माहितीनुसार, सध्या तपास सुरु असून व्हीएसआर कंपनीकडून कागदपत्रे मिळण्यात विलंब होत आहे. कारण, व्हीएसआर कंपनीकडून सध्या कागदपत्रांमध्ये फेरफार करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. दिल्लीवरुन फ्लाईट प्लॅन आल्यानंतर हॅंडलर गोपीने त्यामध्ये बदल केले असावेत. त्यामुळे याप्रकरणाची चौकशी करताना त्यावेळी पाठवण्यात आलेले ई-मेल तपासावेत, असे रोहित पवार यांनी म्हटले.

# बीडमध्ये 'कांदा भेट' आंदोलन: वैभव शिंदेंचे आमदारांना अनोखे साकडे

**नेकनूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यासह राज्यभरात कांद्याचे भाव कोसळल्याने कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे.

बीड जिल्ह्यात सध्या कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. या परिस्थितीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वैभव शिंदे यांनी एक आगळेवेगळे आंदोलन केले आहे. त्यांनी जिल्ह्यातील सात आमदारांना १ किलो कांदा भेट देऊन आगामी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्याची विनंती निवेदनाद्वारे केली आहे.लागवड खर्चही निघत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत.शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी वैभव शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. वैभव शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील सहा आमदारांना प्रत्येकी १ किलो कांदा भेट दिला आहे.केवळ भेट न देता, त्यांनी या आमदारांना एक निवेदनही सोपवले आहे.येणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनात कांद्याला हमीभाव मिळावा कांद्याला योग्य बाजारभाव किंवा शासनाकडून थेट अनुदान मिळावे.निर्यात शुल्काबाबत धोरण स्पष्ट करून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबवावे.बाजारात कांद्याचे दर घसरून ५ ते १० रुपये किलोपर्यंत खाली आले आहेत. शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई व्हावी व कांद्याला ३० रूपये हमीभाव देण्यात यावा यांसह इतर मागण्यांसाठी अधिवेशनात आवाज उठवण्याची मागणी त्यांनी या निवेदनात केली आहे.कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडे शासनाने लक्ष वेधण्यासाठी वैभव शिंदे यांनी हे अभिनव आंदोलन केले आहे. आता आगामी अधिवेशनात बीडचे आमदार यावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# उच्च शिक्षणातून नेतृत्व घडते; गुणवत्तावृद्धीसाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य कृषी महाविद्यालय येथे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ''बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी व कृषी क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व'' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाविद्यालय हे केवळ पदवीपुरते मर्यादित नसून नेतृत्व व गुणवत्तावृद्धी घडविण्याचे केंद्र आहे, असे प्रतिपादन प्राचार्य श्याम भुतडा यांनी केले, तर नियमित अभ्यास, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या बळावर बँकिंग क्षेत्रात नक्कीच यश मिळवता येते, असा प्रेरणादायी संदेश सीनियर मॅनेजर श्याम पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

आदित्य शिक्षण संस्था अंतर्गत आयोजित या उपक्रमात संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. प्राचार्य श्याम भुतडा यांनी महाविद्यालयाची स्थापना, शैक्षणिक प्रगती आणि संशोधनात्मक वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कृषी प्रात्यक्षिके, शेतकरी मार्गदर्शन शिबिरे, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संशोधन प्रकल्प व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यांचा विशेष उल्लेख करत त्यांनी गुणवत्ता वृद्धीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांनी कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत एम.एस्सी. (कृषी), एम.टेक (कृषी अभियांत्रिकी), एमबीए (ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट) आदी अभ्यासक्रमांविषयी




मार्गदर्शन केले. आधुनिक शेती, हवामान बदल, मृदा व्यवस्थापन व तंत्रज्ञानाधारित शेतीसाठी तज्ज्ञाची गरज वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

सीनियर मॅनेजर श्याम पवार यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध संधींचा आढावा घेत सरकारी, खासगी व सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा आणि आवश्यक कौशल्ये याविषयी माहिती दिली. संवाद कौशल्य, संगणक ज्ञान, गणितीय व तर्कशक्ती, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व या गुणांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. सुरुवातीपासूनच आकर्षक वेतन व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले. आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.

### जिद्द व चिकाटीने यश संपादन शक्य

आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. अमोल सानप यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक जीवनात मेहनत, जिद्द आणि चिकाटीचे महत्त्व पटवून दिले. योग्य दिशादर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिक्षणकाळातच स्पष्ट उद्दिष्ट ठरवून त्यासाठी नियोजनबद्ध तयारी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

अमोल सानप यांनी जिद्द व चिकाटीच्या बळावर यश संपादन करता येते, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. धनंजय सातपुते यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थी संग्राम तनपुरे यांनी तर आभार डॉ. निर्मला ठोके यांनी मानले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांनी कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व दिले पटवून

आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांनी कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत एम.एस्सी. (कृषी), एम.टेक (कृषी अभियांत्रिकी) व एमबीए (ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट) आदी अभ्यासक्रमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आधुनिक शेतीत संशोधनाधारित तंत्रज्ञान, हवामान बदल, मृदा व्यवस्थापन व कीड-रोग नियंत्रणासाठी तज्ज्ञांची गरज वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच स्पर्धा परीक्षांचे योग्य नियोजन करून वेळेत अर्ज करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

# सामाजिक उपक्रमांनी डॉ.प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवस साजरा

## निस्वार्थी भावना समाजकल्याणाचे मुळ आहे -अखंडानंगिरी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे नि:स्वार्थपणे लोकांची मदत करणे म्हणजेच प्रत्यक्ष देवाची पूजा आराधना करणे होय . समाजात प्रेम, सहकार्य आणि सहानुभूती वाढवून, गरजू लोकांना आधार देणारी ही उच्च मानवी भावना आहे हे तत्त्व सामाजिक एकता आणि सकारात्मक परिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

समाजातील प्रत्येक माणसात, विशेषतः गरीब, दु:खी आणि गरजूंमध्ये ईश्वर वास करतो, त्यामुळे त्यांची सेवा म्हणजे थेट ईश्वराची आराधना होय

नि:स्वार्थ सेवा: कोणत्याही अपेक्षा न ठेवता समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य करणे, त्यांना स्वावलंबी बनवणे ही खरी




सेवा आहे. नि:स्वार्थ जनसेवेतून माणसाला आंतरिक शांती आणि सर्वोच्च समाधान मिळते.परमेश्वराने जे जिवन आपल्याला दिले ते आनंदाने व निर्व्यसनी पणे जगा व्यसनाच्या आहारी जाऊ नका असे उद्गार अखंडानंदगिरी महाराज यांनी केले. निमित्त होते बीड जिल्ह्याच्या दबंग माझी खासदार डॉ प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते गोपिनाथराव मुंडे वृद्धाश्रम घाटसावळी व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी भवानी गडाचे मठाधिपती अखंडानंदगिरी महाराज यांच्या हस्ते आश्रमातील २५ आजी ,आजोबा यांना कपडे आणि साड्या वाटप व जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र घाटसावळी येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड हे होते त्यांच्या समवेत भाजपा नेते चंद्रकांत फड,भगीरथ आबा बांडे,पंजाबराव काकडे,भाजपा ता. सरचिटणीसहरिष खाडे,उपाध्यक्ष संजय काळे,अशोक वैद्य,नितीन खाडे,बारीक कडेकर,राहुल आठवलेआदी प्रमुख

उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत फड यांनी केले ते म्हणाले लोकनेते स्व.गोपिनाथराव मुंडे साहेबांनी जो समाज सेवेचा आदर्श आम्हाला घालून दिला त्यावरच आपली वाटचाल आहे.

आगामी काळात भविष्यात अजुन बरेच सामाजिक उपक्रम घेऊन मुंडे साहेबांचा विचारांचा वसा आणि वारसा पुढे चालवु असं ते म्हणाले म्हणाले.कार्यक्रमाचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन फड यांनी केले तर सुत्रसंचलन प्रकल्प समन्वयक व समुपदेशक प्रा.आजिनाथ शेरकर यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आश्रम व व्यसनमुक्तीचे कर्मचारी संजय फड शहादेव फड, गोरख फड , दादासाहेब जावळे, अमोल नेहरकर, संकेत दराडे यांनी परीश्रम घेतले शेवटी सामुहिक पसायदान व राष्ट्रगीत समुपदेशिका सौ.वर्षा शेरकर यांनी घेतले व कार्यक्रमाची सांगता झाली.

# मराठा सेवा संघाच्या वतीने हनुमंत पवार यांचे व्याख्यान आणि मराठाभूषण पुरस्कार वितरण सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

शिवजयंती निमित्त मराठा सेवा संघ, बीड यांच्या वतीने यंदाही विशेष व्याख्यान व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते शिवश्री हनुमंत पवार यांचे ''वारकरी विचार स्वराज्याचा जयजयकार, संविधानाचा स्वीकार''

या अत्यंत समकालीन व प्रेरणादायी विषयावर व्याख्यान संपन्न होणार आहे.

मराठा सेवा संघाचे 'मराठा भूषण' पुरस्कार जाहीर झाले असून वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. हा सोहळा दि. २० फेब्रुवारी २०२६, वार शुक्रवार, सायं. ७.०० वा., यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजाच्या तळागाळातील घटकांसाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा 'मराठा भूषण' पुरस्काराने विशेष गौरव करण्यात येणार आहे.

यावर्षीचे मानकरी पुढीलप्रमाणे सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल शिवश्री डॉ. गणेश ढवळे

वैद्यकीय क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल प्रसिद्ध बालरोगतज्ञ शिवश्री डॉ. प्रदीप शेळके

सामाजिक व उद्योग क्षेत्रातील योगदानाबद्दल शिवश्री प्रकाश कवठेकर

महिलांमधून 'जिजाऊरत्न' पुरस्कार शिवमती जयश्रीताई पांडुरंग सावंत

विशेष गौरव पुरस्कार समाज प्रबोधनकार शिवश्री संतोष डोंगरे प्रशासकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल शिवश्री मधुकर शेळके

सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी शिवमती प्रियाराणी पाटील,शिवश्री अजय पाटील, अध्यक्ष, छत्रपती शाहू बँक, बीड जिल्हा हिवताप अधिकारी शिवश्री विजयसिंह शिंदे,मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष शिवश्री अशोक ठाकरे या सर्व मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. तरी सर्व शिवप्रेमी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवजन्मोत्सव व 'मराठा भूषण' पुरस्कार सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन मराठा सेवा संघ बीड, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदर्श देवगाव येथील वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

**बीड/वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदर्श देवगाव येथील वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या उत्साहात व आनंदात संपन्न झाले आहे

शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंददायी कार्यक्रम असतो या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालक एकत्र येऊन एकमेकांशी संवाद साधतात, मैत्री वाढवतात आणि एकमेकांच्या यशाचा आनंद साजरा करतात. स्नेहसंमेलनाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना वाढवणे आणि शाळेतील सामाजिक वातावरण अधिक सुदृढ करणे हा असतो.स्नेहसंमेलनात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, नृत्य, गायन आणि नाट्य सादर केले जातात. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या छुप्या प्रतिभा दाखवण्याची संधी मिळते. तसेच, शिक्षक आणि पालक यांचाही सहभाग असतो, ज्यामुळे शाळा आणि घर यांच्यातील नाते अधिक घट्ट होते. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक यशासाठी पुरस्कारही दिले जातात, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकत्रितपणा आणि मैत्रीची भावना वाढते. हा कार्यक्रम केवळ आनंद साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, तो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. त्यामुळे प्रत्येक शाळा वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन नियमितपणे करते आणि त्याला मोठ्या उत्साहाने सहभागी होते

या वेळी उपस्थित प्रमुख पाहुणे पत्रकार मा. बंडुजी



### स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये एक चांगली ऊर्जा प्रेरणा देते -आनंद काळे

खांडेकर. युवा नेते आनंदजी काळे.

सामाजिक कार्यकर्ते मा. जगदीश फरताडे मा. सचिन लंगडे युवा नेते केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे सर सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवगाव येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकशालेय समिती अध्यक्ष व उपाध्यक्ष सदस्य व शिक्षणप्रेमी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार बांधव अंगणवाडी सेविका/ मदतनीस गावचे माजी /आजी सरपंच. उपसरपंच सदस्य डॉक्टर. वकील विविध क्षेत्रातील मान्यवर. व गावचे नागरिक महिला मंडळी. विद्यार्थी व विद्यार्थिनी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित रहा -पवार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगर परिषद आयोजित गेवराई महोत्सव २०२६ मध्ये सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रम पुनश्च सुरू करण्यात येत असून, सदरील सांस्कृतिक महोत्सव दिनांक १८/०२/२०२६ रोजी, वार बुधवार, दुपारी ४.०० वाजता भगवती टॉकीज परिसरातील मैदानावर आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांनी केले आहे.

नगर परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या

कार्यक्रमामध्ये शहरातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांचा संघ मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, भगवती टॉकिज परीसरात संपन्न होणार असलेल्या कार्यक्रमात सांस्कृतिक स्पर्धा पार पडणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार, नपचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरगे यांनी केले आहे.

# शेतकरी विरोधी भारत अमेरिका व्यापार करायची शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने होळी

**बीड । प्रतिनिधी**

अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार करारांतर्गत भारतीय कृषी बाजारपेठ ही अमेरिकेकरिता खुली करण्यात आलेली नसल्याचे सांगत शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न राज्याचे प्रमुख पालकत्व असलेले मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

परळी येथे सोमवार दि १६ रोजी परळी वैजनाथ येथे आयोजित महा एक्सपो २०२६ पशुप्रदर्शनात मा मुख्यमंत्री यांनी भारत अमेरिका या मध्ये नव्याने झालेला व्यापार करार याचे स्वागत करत मुख्यमंत्र्यांनी देशाचे प्रधानमंत्री यांचे आभार मानले आणि भारतासाठी अमेरिकेची मोठी बाजारपेठ खुली झाल्याचे सांगितले. तसेच कृषी क्षेत्रात कोणत्याही अमेरिकन मालाला भारतात खुली सूट दिली नसल्याचे या करारात लिहिले आहे. असे सांगतानाच कृषी क्षेत्रा संदर्भात कसल्याही प्रकारचा समझोता झाला नसल्याचे सांगत काही लोक जाणीवपूर्वक अफवा पसरून कृषी मालाचे भाव पाडत असल्याचे ठणकावून




सांगितले.

मात्र इथेनॉल, भारतात बंदी असलेल्या जीएम सोयाबीन पासून तयार केलेले खाद्यतेल, सोयापेंड, पशुखाद्य, स्पिरिट, सुकामेवा, फळे, भाज्या व पोल्ट्री कृषी मालावर प्रक्रिया करून तयार केलेले अन्नपदार्थ यासाठी तूर्तास अमेरिकन मालास ० आयात शुल्कात भारतीय बाजारपेठ खुली करून दिली आणि याच वेळी भारतीय मालावर मात्र १८ आयात शुल्क आकारले. भारतीय कृषी बाजारावर याचा परिणाम होणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एका बाजूला पर्यावरण, निसर्ग आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे गुणगान गात दुसऱ्या बाजूला उद्योगपत्यांना खाणीसाठी, बंदरासाठी जंगल, जल, जमीन पर्यायी पर्यावरणाचा सगळ्यात मोठा नाश या दहा वर्षाच्या काळामध्ये झालेला आहे.

म्हणून शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने भारत अमेरिका व्यापार कराराची होळी करण्यात आली. यावेळी कुलदीप करपे, माजी सैनिक अशोक येडे, प्रा.संगमेश्वर आंधळकर, कॉ. सुहास जायभाये, ॲड. गणेश मस्के, शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, शेतकरी पुत्र राजू गायके, कॉ. भाऊराव प्रभाळे, शिवा चव्हाण, रामधन जमाले, प्रा. ज्ञानेश्वर राऊत, प्रा. डी.जी. तांदळे, श्रीकांत गदळे उपस्थित होते.

# रोटरी मोफत सर्व रोग निदान व औषधोपचार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; महाशिवरात्रीनिमित्त ४२६ भाविकांनी घेतला लाभ

**बीड । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व स्वातंत्र्य सैनिक कै. एकनाथरावजी ढगे सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने महाशिवरात्री निमित्त संगमेश्वर संस्थान महादेवमळी , कुर्ला येथे मोफत सर्व रोग निदान व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास भाविक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून एकूण ४२६ भाविकांनी आरोग्य तपासणी व मोफत उपचारांचा लाभ घेतला. सदरील शिबिराचे हे १७ वे वर्ष होते . डॉ प्रविण ढगे यांनी त्यांच्या आजोबांच्या स्मरणार्थ या शिबिराची



सुरवात केली होती व पुढे रोटरी क्लबच्या सहकार्याने त्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

सदरील शिबिराचे उद्घाटन ह.भ.प. श्री. पुरुषोत्तम महाराज मस्के व ह.भ.प. श्री. दत्ता महाराज बडगे यांचे शुभाशीर्वादाने झाले. विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची तपासणी करून आवश्यक मोफत औषधोपचार देण्यात आले. यामध्ये मधुमेह व हृदयविकार तज्ज्ञ डॉ. किरण सवासे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सिताराम आळणे, दंत व मुखरोग तज्ज्ञ डॉ.शितल ढगे व डॉ प्रविण ढगे , नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. अभिनव मुळे, होमिओपॅथिक व जनरल फिजिशियन डॉ. निलेश जगदाळे, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. सुषमा खोसे, बालरोग तज्ज्ञ डॉ. अजय जाधव व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. पूजा जाधव-माने,डॉ पूजा कदम, डॉ रोहिणी डफले, डॉ समृद्धी यांनी सेवा दिली. या उपक्रमासाठी एम. आर. असोसिएशनचे सचिव विकास गव्हाणे, गोविंद ढगे, रुस्तुम गव्हाणे, श्री. नितीन मोरे, श्री. परम धपाटे,आदित्य गुंड पाटील, श्री. माऊली वाघमारे ,सिद्धेश्वर धुमक, गणेश बागडे, राज व गजानन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या शिबरस्थळी मा. मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. इंजी. राहुल बोरा, सचिव रो. प्रा. डॉ. प्रकाश कोंका, प्रोजेक्ट चेअरमन रो. प्रा. डॉ. प्रवीण ढगे व डॉ. निलेश जगदाळे यांच्यासह कोषाध्यक्ष रो. भारत शेटे, रो. सर्वज्ञ जोशी, रो. बद्री मानधने आदींनी विशेष परिश्रम घेतले. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर आयोजित या आरोग्य शिबिरामुळे भाविकांना मोफत तपासणी, तज्ज्ञ सल्ला व मोफत औषधोपचार उपलब्ध होऊन सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम यशस्वी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रमजान महिन्यात परळीत पाणीपुरवठा सुरळीत करू- सभापती जयश्रीताई गित्ते

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर परळी नगर परिषद पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांनी आढावा बैठक घेतली. रमजान महिन्यात शहरात अखंडित व सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

आ. धनंजय मुंडे, ना. पंकजाताई मुंडे व लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांच्या दालनात झालेल्या बैठकीत झाली व मार्गदर्शन केले. रमजान महिन्यात उपवास (रोजा), धार्मिक विधी आणि स्वच्छतेला विशेष महत्त्व असल्याने पाणीपुरवठ्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी विभाग सतर्क राहणार असल्याचे सांगण्यात आले. परळी वैजनाथ शहरातील विविध प्रभागांतील नगरसेवकांनीही आपल्या सूचना मांडल्या असून त्या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. ज्या भागात पाणीपुरवठा कमी दाबाने किंवा अनियमित होत असेल, त्या भागातील तक्रारी तत्काळ सोडवण्यात येणार आहेत.तसेच, ज्या भागात पाणीपुरवठा होत नाही अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार एक महिन्यापर्यंत टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्याची तयारी नगर परिषद प्रशासनाने दर्शविली आहे. नागरिकांनी पाणीपुरवठा संदर्भातील अडचणी असल्यास नगर परिषद पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी युवा नेते रवींद्र (पापा) गित्ते यांच्यासह नगरसेवक अजिज कच्ची, नगरसेवक मंगल इस्माईल, हाजी बाबू, नगरसेवक कादर कुरेशी, नगरसेवक नितीन बागवाले, नगरसेवक अल्ताफ पठाण,नगरसेवक सय्यद हसन, नगरसेवक मोसीन,नगरसेवक बबुभाई, युवा नेते राजीव शेख तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख किरण उपाडे व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande Email-prarambh2023@gmail.com

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे Email-prarambh2023@gmail.com




सायं.दैनिक बीड

# प्रारंभ

बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६






# मुंबई क्लायमेट वीकमध्ये पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला कृतीप्रधान लढ्याचा संदेश

मुंबई । प्रतिनिधी

हवामान कृतीसाठी शासन, शहर संस्था आणि नागरिक यांची भागीदारी आवश्यक असून युवकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. समुदाय जनजागृती, हवामान साक्षरता आणि युवक उपक्रमांद्वारे शाश्वत महाराष्ट्र घडवण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री मंत्री पंकजा मुंडे आज येथे केले.

मुंबई क्लायमेट वीकचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज जिओ वर्ल्ड कन्व्हेशन सेंटर येथे झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याच्या पर्यारवण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. केंद्रीय नवनवीनीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रम विभागाचे संचालक मार्टिन क्रुसे आदी मान्यवर उपस्थित होते.

विविध देशांतील प्रतिनिधी मुंबई क्लायमेट वीकच्या मंचावर एकत्र येत असून, जागतिक सहकार्य आणि व्यवहार्य भागीदारीतूनच हवामान कृती यशस्वी होईल. भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि




सुरक्षित पर्यावरण निर्माण करणे हीच आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे श्रीमती मुंडे यांनी यावेळी अधोरेखित केले. हवामान बदलाविरुद्धचा लढा आता केवळ चर्चेपुरता न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात

## हवामान कृतीसाठी युवकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा पंकजा मुंडे

पोहोचल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जगभरातील शहरांनी हवामान कृतीची जबाबदारी स्वीकारली असून, भारताकडून या जागतिक चळवळीत मुंबई क्लायमेट वीक हा ठोस आणि कृतीप्रधान वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

''संपूर्ण जग एक कुटुंब आहे'' ही आपल्या संस्कृतीची भावना हवामान कृती ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित करते. एका प्रदेशावर होणारा परिणाम अखेरीस सर्वांवर होतो. महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईसमोर उभे असलेले हवामान आव्हान गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. वाढते शहरी तापमान, अतिवृष्टी, पूरस्थिती, किनारपट्टीवरील ताण आणि वायू गुणवत्तेवरील दबाव या गंभीर बाबी आहेत. ग्रामीण महाराष्ट्रातही अनपेक्षित दुष्काळ व पूर यांचा फटका बसत असून या पार्श्वभूमीवर मुंबई क्लायमेट वीकची संकल्पना हा उपक्रम केवळ चर्चेसाठी नसून प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि वित्तपुरवठ्याच्या मार्गांना चालना देण्यासाठी आहे. सर्वांनी या मंचातील चर्चांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून व्यवहार्य उपाय सुचवावेत, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले.

महाराष्ट्र औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि विकासाच्या आघाडीवर असताना हवामान प्रतिकार शक्ती, आर्थिक विकास आणि सामाजिक समावेशन यांचा समन्वय असलेल्या हवामान संवेदनशील विकासाची दिशा स्वीकारत असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले. ऊर्जा, नागरी विकास, पाणी आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत शाश्वततेला केंद्रस्थानी ठेवून कृतीप्रधान धोरण राबवले जात आहे. सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमतेचा विस्तार, शहर नियोजनात हवामान जोखमींचा समावेश आणि विभागनिहाय शाश्वत नियोजन यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी यावेळी

# जिद्द आणि चिकाटीने काकडहीरा गावच्या मुलींनी साधली उच्च यशाची शिखरे -राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

आजच्या स्पर्धेच्या युगात करिअर घडवण्यासाठी केवळ उच्च शिक्षण पुरेसे नसून, त्यासोबतच जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम हवो असतात. अशाच जिद्दीने आणि अविरत मेहनतीने काकडहिरा ता.ता बीड येथील रेणुका अशोक बागलाने यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्य स्तरावर २४ वा क्रमांक पटकावत कृषी उपसंचालक पदावर नियुक्ती मिळवून बीड जिल्ह्याचा मान उंचावला आहे. त्याच प्रमाणे काकडहिरा येथीलच रंजना संदिपान बागलाने यांनी एमपीएससीच्या माध्यमातून पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर, तर गळवाडी येथील अनंत मस्के



यांनी राज्य कर निरीक्षक (एसटीआय) पदावर यश संपादन केले आहे.

या तीनही तरुणांनी शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबात जन्म घेऊन ग्रामीण परिस्थितीतील अडचणींवर मात करत प्रबळ इच्छाशक्ती आणि अथक परिश्रमाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या घवघवीत कामगिरीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी काकडहिरा येथे आयोजित सत्कार समारंभात त्यांचा गौरव करताना मनोगत व्यक्त केले. कु रेणुका बागलाने, रंजना बागलाने आणि अनंत मस्के यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीने ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. हे यश केवळ त्यांच्या कुटुंबाचे नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्याचे अभिमानाचे आहे,''

असे गौरवोद्गार जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी काढले. या तिघांच्या यशाचा आनंद व्यक्त करण्यासाठी काकडहिरा ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. उत्साहपूर्ण वातावरणात काकडहिरा गावातून मिरवणूक काढण्यात आली. महिला व पुरुष ग्रामस्थ, तरुण वर्ग आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून या यशाचा आनंद साजरा केला. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून उच्च पदावर पोहोचलेल्या या तरुणांची कहाणी अनेकांना प्रेरणा देणारी आहे जिद्द, मेहनत आणि सातत्याने प्रयत्न केले तर कोणतेही शिखर गाठता येते, हे त्यांनी प्रत्यक्ष सिद्ध केले आहे.

# घरकुल योजनेची जिल्हा प्रशासनाकडून क्रूर थट्टा!

## ग्रामस्थांना घरकुलासाठी २ लाखांचा निधी; डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च, जिल्हाधिकारी व सीईओंकडे तक्रार डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत बेघरांना साधारण दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते; मात्र बीड जिल्हा परिषदेच्या आवारात उभारण्यात आलेल्या डेमो घरकुलासाठी तब्बल दहा लाख रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी बीड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

घरकुल योजनेत केंद्र शासनाकडून सुमारे १ लाख २० हजार रुपये, राज्य शासनाकडून अतिरिक्त ५० हजार रुपये, मनरेगा अंतर्गत २६ ते २८ हजार रुपये आणि स्वच्छतागृहासाठी १२ हजार रुपये असे मिळून एकूण सुमारे दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र जिल्हा परिषद आवारातील डेमो हाऊससाठी ३१ जानेवारी २०२४ रोजी ४ लाख ९९ हजार २७८ रुपयांची वर्क ऑर्डर देण्यात आली. त्यानंतर



५ जानेवारी २०२६ रोजी आणखी ४ लाख ९९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे एकाच कामासाठी दोन टप्प्यांत सुमारे १० लाखांचा खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे.

उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसमध्ये एक लहान हॉल व दोन छोट्या खोल्या असून दोन लोखंडी दरवाजे, दोन मोठ्या खिडक्या व एक छोटी खिडकी बसविण्यात आली आहे. घर पत्र्याचे असून सुमारे २१७ चौरस फुट बांधकामासाठी सहा कॉलम उभारण्यात आले आहेत. पत्र्याच्या घरासाठी स्लॅबसाठी लागणारे कॉलम उभारण्याची गरज काय, असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे. ''घरकुल मंजुरीपासून हप्ते खात्यावर पडण्यापर्यंत चिरीमिरी द्यावी लागते. शासनाकडून मंजूर ५ ब्रास वाळू प्रत्यक्षात मिळत नाही. हातात सव्वा लाख रुपये उरतात, त्यातून घर कसे बांधायचे?'' असा सवाल ग्रामस्थ करत असताना डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च म्हणजे घरकुल योजनेची क्रूर थट्टा असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली आहे.सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.




